महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००५

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२५/1488 दिनांकः 09 MAY 2025

तात्काळ/ईमेल-द्वारे

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय व अनुदानित,
पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था,अधिनस्त तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषयः- मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण दि.२०/०९/२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाची प्रभावी अमलबजावणी करण्याबाबत.**

संदर्भ:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५/२४६, दि.२८/०४/२०२५.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, मा.श्री रविंद्र चव्हाण, विधानसभा सदस्य यांनी मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना उददेशून दिलेले निवेदन पत्र वरील संदर्भीय पत्रानुसार या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

सदर निवेदनात इतर मागास बहुजन कल्याण विभाग, यांचे शासन शुध्दीपत्रक क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दि.२०/०९/२०२४ नुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजनाकरिता **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र बंधनकारक** करणेबाबत मान्यता दिलेली आहे. परंतु अद्यापही या आदेशाची अंमलबजावणी संबंधीत शासकीय, अशासकीय व शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांचे मार्फत होत नसल्याचे तक्रार दिलेली आहे.त्यानुषंगाने आपणांस सुचित करण्यात येते की, **इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे दि.२०/०९/२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाची अंमलबजावणी आपल्या स्तरावर तात्काळ करण्यात यावी.**

तसेच आपणामार्फत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

**सोबतः- वरीलप्रमाणे.**

9.5.25

(अक्षय जोशी)
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**

प्रति:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,(कार्यासन क्र.१८), म.रा.मुंबई यांना माहितीस्तव.

Ac

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल--desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे**

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५/ २४६
दिनांक:- २८/०४/२०२५

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

**विषय:- मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुल कल्याण विभागाच्या क्र. शिवृत्ती-२०२३/ प्र.क्र.१३५/प्र.क्र.२२१/शिक्षण दि. २०/०९/२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाची प्रभावी अमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ:**-१. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रत्र क्र. संकिर्ण-२०२५/प्र.क्र.५०/तांशि-४, दि.१८/०३/२०२५
२. मा. रविद्र चव्हाण यांनी मा. ना. श्री. चंद्रकांत पाटील, मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांना उद्देशून लिहिलेले जा. क्र. १२२/२०२५, दि. ०४/०२/२०२५ रोजीचे पत्र.
३. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दि. २०/०९/२०२४.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. श्री. रविंद्र चव्हाण, विधानसभा सदस्य यांचे पत्र संदर्भीय क्र. १ नुसार संचालनालयास प्राप्त झाले असून इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. शिवृत्ती-२०२३/ प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दि. २०/०९/२०२४ नुसार विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाकरीता नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत मान्यता दिलेली आहे. परंतू, अद्यापही या आदेशाची अंमलबजावणी संबंधित शासकीय, अशायकीय व शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांचे मार्फत होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत तपासून अवगत करावे असे नमुद केले आहे.

तरी याबाबत सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, आपल्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व संस्थांना संदर्भ क्र. ३ दि. २०/०९/२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकानुसार अंमलबजावणी करण्याबाबत कळविण्यात यावे. याबाबत केलेल्या कार्यावाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ पाठवावा.

सोबत: १. मा. रविद्र चव्हाण, विधानसभा सदस्य यांचे पत्र.
२. दि. २०/०९/२०२४ रोजीचे शासन शुध्दीपत्र.

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
07 MAY 2025
आवक क्र. 1211

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

शिक्षण
दि. ७/५/२५

प्रत. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी. (लक्षवेध-श्री. अजितकुमार थोरात, कक्ष अधिकारी)

0 6 FEB 2025 ७७|नाशी-४ २७|०२|२५

# रविंद्र चव्हाण

कार्यकारी अध्यक्ष - भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश
विधासभा सदस्य - १४३ डोंबिवली (जि. ठाणे)
माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य

जा.क्र. १२२ /२०२५, जा.क्र. मंत्री/उ.व तंत्र शि., .सं.कार्य/ व्ही.आय.पी./मुं./ 7887610 12-02-25 दिनांक : ०४-०२-२०२५

प्रति,

मा.ना.श्री. चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील,
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

अ.नु.स. उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. 7887610 दि. 17/02/25

विषय :- मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/प्र.क्र.२२१/ शिक्षण-१ दिनांक २०.०९.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत.

महोदय,

राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदातिन महाविद्यालये / तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपर्ती योजनाकरिता सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ६.०० लक्ष वरुन रुपये ८.०० लक्ष करण्याची अट रद्द करुन त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यास शासनाच्या इतर मागास बहुल कल्याण विभागाच्या क्र.शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक-२०.०९.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता दिलेली आहे.

परंतू, अद्यापही या आदेशाची अंमलबजावणी संबंधित शासकीय, अशासकीय व शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतन यांचे मार्फत होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब मागासवर्गीय घटकातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी अन्यायकारक असल्यामुळे विद्यार्थी हितास्तव उक्त आदेशांची तातडीने प्रभावी अंमलबजावणी सुरु करण्याकरिता सर्व संबंधितांना आपल्या स्वरावरुन आदेश व्हावेत, अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

(रविंद्र चव्हाण)

कार्यालय : सी. डी. ओ. बॅरक नं. १, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०. दुरध्वनी : ०२२-२२०२२०५०/२२०४८६८७
मतदारसंघ कार्यालय : जाणता राजा स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान, वीर सावरकर रोड, डोंबिवली पूर्व, जि. ठाणे - ४२१ २०१.
Web. : www.ravindrachavan.in E-mail : ravindrachavan.mla@gmail.com

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाकरिता नॉन -क्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : शिवृत्ती-२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण-१
मोती महल, २ रा मजला, १९५,जे. टाटा रोड, चर्चगेट,मुंबई-४०००२०
दिनांक : २० सप्टेंबर, २०२४.

संदर्भ- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इबीसी-२०१६/प्र.क्र.२२१/ शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६
२) शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांकः इबीसी-२०१७/ प्र.क्र.२७/ शिक्षण, दिनांक ०१ जानेवारी, २०१८

शासन शुध्दीपत्रक

संदर्भाधीन शासन निर्णय क्र.२ येथील परिच्छेद क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ६.०० लक्ष वरुन रुपये ८.०० लक्ष करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे"

सदर शासन निर्णयातील उपरोक्त मजकुरा ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे.

"राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाकरिता उत्पन्नाची अट रद्द करण्यात येत असून त्याऐवजी नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे."

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२४०९२३१५५४३७४८३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAKASH SHRIDHAR DHAWLE

Digitally signed by PRAKASH SHRIDHAR DHAWLE

(डॉ. प्रकाश धावले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.